**<u>ठळक बातम्या</u>**

- मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली ओबीसी शिष्टमंडळाची बैठक; ओबीसीसह कोणत्याही समाजावर अन्याय होऊ देणार नाही अशी मुुख्यमंत्र्यांची ग्वाही

- अनुकंपा तत्वावर निवड झालेल्या दहा हजारांपेक्षा जास्त उमेदवारांना मुख्यमंत्र्यांच्या हस्ते नियुक्तीपत्रं प्रदान

- दोन वर्षांहून कमी वयाच्या बालकांना सर्दी-खोकल्याची औषधं देऊ नयेत, अशा केंद्रीय आरोग्य मंत्रालयाच्या राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना सूचना

- वेस्ट इंडिजविरूद्धच्या कसोटी क्रिकेट मालिकेतला पहिला सामना जिंकून भारताची मालिकेत एक-शून्यने आघाडी

**आणि**

- ज्येष्ठ अभिनेत्री संध्या शांताराम यांच्या पार्थिवावर मुंबईत अंत्यसंस्कार

**<><><><><>**

राज्य शासन कायम कायद्याच्या चौकटीत राहून निर्णय घेत असतं. त्यामुळे ओबीसींसह कोणत्याही समाजावर अन्याय होणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. सह्याद्री अतिथीगृह इथं मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली ओबीसी शिष्टमंडळाची बैठक झाली. त्यात ते बोलत होते.

ओबीसी समाजासाठी राज्य सरकार देत असलेल्या निधीची, समाजासाठी स्थापन केलेल्या स्वतंत्र मंत्रिमंडळ उपसमितीच्या अधिकारांची माहिती यावेळी मुख्यमंत्र्यांनी दिली. तसंच अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या सर्व योजना या इतर मागास प्रवर्गातील महामंडळांना लागू केल्या आहेत, याचाही त्यांनी आवर्जून उल्लेख केला. ओबीसी समाजानं राज्य सरकारकडे २ सप्टेंबरचा शासन आदेश रद्द करावा आणि २०१४ पासून दिलेल्या जात आणि जात वैधता

प्रमाणपत्रांची श्वेत पत्रिका काढावी अशा दोन प्रमुख मागण्या केल्या होत्या. त्यावर सरकारकडून या बैठकीत सकारात्मक प्रतिसाद मिळाला नसल्यानं १० ऑक्टोबरला सकल ओबीसी समाजाचा मोर्चा निघणार, असल्याचं ओबीसी संघटनांच्या प्रतिनिधींनी सांगितलं.

या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूल मंत्री तथा ओबीसी मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री छगन भुजबळ, पर्यावरण आणि वातावरणीय बदल आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे आणि ओबीसी समाजाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

**<><><><><>**

नाशिक इथे २०२७ मध्ये भरणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठीची सर्व पायाभूत सुविधांची कामं दर्जेदार आणि वेगाने पूर्ण करावीत असे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले आहेत. मुंबईत सह्याद्री अतिथीगृहात झालेल्या कुंभमेळ्याच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. कुंभमेळ्याच्या प्रचार प्रसिध्दीसाठी 'डिजिटल कुंभ' ही संकल्पना राबवण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

**<><><><><>**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आज मुंबईत आयोजित कार्यक्रमात अनुकंपा तत्वावरील गट क, गट ड मधील तसंच राज्य लोकसेवा आयोगातर्फे सरळसेवा भरतीद्वारे निवड झालेल्या एकूण दहा हजारांपेक्षा जास्त उमेदवारांना नियुक्तीपत्रं प्रदान करण्यात आली. प्रशासनाचं बळकटीकरणाला सरकारचं प्राधान्य आहे, संस्थात्मकदृष्ट्या प्रशासनाला बळकट केलं तरच प्रशासन गतीशील, संवेदनशील आणि लोकाभिमुख होऊ शकतं, असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. या दृष्टीनं अनुकंपा तत्वावरील शासन निर्णयात सुधारणा केल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

**होल्ड बाईट मुख्यमंत्री**

अनुकंपा तत्वावरल्या ८० टक्के जागा भरल्या असून उरलेल्या जागा काही दिवसात भरल्या जातील, असंही मुख्यमंत्री म्हणाले.

तर नवनियुक्त कर्मचाऱ्यांनी ई-गव्हर्नन्सचा वापर वाढवण्याचे, लोकाभिमुख कारभार करण्याचे आणि प्रामाणिकपणे जबाबदाऱ्या पार पाडण्याचे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केलं.

दरम्यान, गडचिरोली, गोंदिया, धुळे, यवतमाळ, लातूर आणि हिंगोलीमधेही पालकमंत्र्यांच्या हस्ते अनुकंपा आणि सरळसेवा पदभरतीच्या २१० उमेदवारांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आली.

**<><><><><>**

शेतकऱ्यांनी बाजारपेठेच्या मागणीनुसार पीकपद्धतीत बदल करून उत्पन्नवाढ करावी, असं आवाहन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केलं आहे. नागपूर मध्ये आयोजित शेतकरी मेळाव्यात ते आज बोलत होते. शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढलं, तर देशाचं अर्थकारण मजबूत होईल. त्यामुळे शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करून उत्पादन आणि मूल्यवृद्धी या दोन्ही दिशांनी पुढे जायला हवं, असं ते म्हणाले. साखर कारखाने पूर्ण क्षमतेनं चालावेत यासाठी नागपूर, भंडारा आणि वर्धा या जिल्ह्यांमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून ऊस लागवडीला प्रोत्साहन देणं आवश्यक आहे, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीनं माजी खासदार राजू शेट्टी यांच्या नेतृत्वात आज छत्रपती संभाजीनगर इथं रस्ता रोको आंदोलन करण्यात आलं. जिल्ह्यातली पूरस्थिती, पंचनामे, मागील वर्षीची थकीत ऊसबिलं, शेतकरी आत्महत्या या विषयांवर शेट्टी यांनी सरकारवर टीका केली. २०१९ च्या शासन निर्णयाप्रमाणे शेतकऱ्यांना सरसकट तीन हेक्टरपर्यंत मदत देण्याची मागणी शेट्टी यांनी सरकारकडे केली. तसंच शेतकऱ्यांनी आत्महत्या न करता आपल्या

हक्कासाठी लढण्याचं आवाहन त्यांनी यावेळी केलं. शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी मदत न केल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा राजू शेट्टी यांनी दिला.

**<><><><><>**

वस्तू आणि सेवा परिषदेने जीएसटी कररचनेत केलेल्या सुधारणा २२ सप्टेंबरपासून लागू झाल्या आहेत. यामुळे समाजातल्या सर्व घटकांना लाभ झाला आहे. आज ऐकूया मालवाहतूक करणाऱ्या वाहनांवरच्या करांविषयी....

**होल्ड... व्हॉईस कास्ट**

*(वस्तू आणि सेवा करांमधल्या सुधारणांनुसार ट्रक, डिलिव्हरी व्हॅन यासारख्या मालवाहतूक करणाऱ्या व्यावसायिक वाहनांवरचा जीएसटी २८ टक्क्यांवरून १८ टक्के करण्यात आला आहे. लघु आणि मध्यम मालवाहतूकदारांना सुलभपणे मालवाहतूक करता यावी हा या मागचा उद्देश आहे. या कर कपातीमुळे देशातल्या दळणवळण क्षेत्राचं पुनरुज्जीवन होऊ शकेल. जीएसटी कमी झाल्यामुळे जीवनावश्यक वस्तूंच्या प्रतिटन वाहतुकीचा दर कमी होईल. त्यामुळे मालाची विक्री होतानाही तो परवडणाऱ्या दरात उपलब्ध करून देता येईल. तसंच, पुरवठा साखळीवर अनुकूल परिणाम होईल आणि निर्यातीतली स्पर्धा वाढेल.)*

**<><><><><>**

दोन वर्षांहून कमी वयाच्या बालकांना सर्दी-खोकल्याची औषधं दिली जाऊ नयेत, अशी सूचना केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं दिली आहे. राजस्थान आणि मध्य प्रदेशमध्ये कथित कफ सिरपच्या सेवनानं काही मुलांचे मृत्यू झाल्याच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारनं हा सल्ला दिला आहे. पाच वर्षांहून कमी वयाच्या मुलांना साधारणपणे ही औषधे दिली जात नाहीत आणि पाच वर्षांपेक्षा मोठ्या वयाच्या मुलांसाठी या औषधांचा वापर सावधगिरीनं आणि डॉक्टरांच्या देखरेखीखाली करणं आवश्यक आहे, असं मंत्रालयानं जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांमध्ये म्हटलं आहे. सर्व राज्य आणि केंद्र शासित प्रदेशांच्या आरोग्य सेवा संचालकांना पत्र लिहून या सूचना केल्या आहेत.

**<><><><><>**

विकसित भारताच्या दिशेनं वाटचाल करताना महिला आणि बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी सर्व

राज्यांनी करावी. त्यासाठी केंद्र शासन सर्वतोपरी सहकार्य करेल, असं प्रतिपादन केंद्रीय महिला आणि बालविकास मंत्री अन्नपूर्णा देवी यांनी केलं.

<><><><><>

भारतानं वेस्ट इंडिजविरूद्धच्या कसोटी क्रिकेट मालिकेतला पहिला सामना एक डाव आणि १४० धावांनी जिंकून मालिकेत १ - ० अशी आघाडी घेतली आहे. भारतानं आज तिसऱ्या दिवशीच वेस्ट इंडिजचा पराभव केला. आजच्या दिवसाचा खेळ सुरु झाला तेव्हा भारतानं आपला पहिला डाव ५ बाद ४४८ धावांवर घोषित केला. त्यावेळी भारताकडे २८६ धावांची आघाडी होती. त्यांनतर फलंदाजीला आलेल्या वेस्ट इंडिजच्या दुसऱ्या डावाची सुरुवात निराशाजनक झाली. भारताच्या गोलंदाजांनी उत्तम कामगिरी करत वेस्ट इंडिजला जम बसवू दिला नाही. वेस्ट इंडिजच्या अलिक अथानाझे याच्या ३८ धावा वगळता इतर कोणताही खेळाडू आपली चमक दाखवू शकला नाही. वेस्ट इंडिजचे फलंदाज झटपट बाद होत गेल्यानं त्यांना मोठी धावसंख्या उभारता आली नाही, त्यांना सर्व बाद १४६ धावाच करता आल्या. रविंद्र जडेजानं चार, मोहम्मद सिराजनं तीन, कुलदीप यादवने दोन, तर वॉशिंग्टन सुंदरनं एक गडी बाद केला.

<><><><><>

ज्येष्ठ अभिनेत्री आणि नृत्यांगना संध्या शांताराम यांचं काल निधन झालं. त्या ८७ वर्षांच्या होत्या. निर्माता आणि दिग्दर्शक व्ही. शांताराम यांच्या नवरंग या चित्रपटातून त्यांना प्रसिद्धी मिळाली. अरे जा रे हट नटखट हे त्यांचं गाणं लोकप्रिय ठरलं होतं. त्याशिवाय झनक झनक पायल बाजे, जल बिन मछली- नृत्य बिन बिजली, दो आँखे बारह हात, अमर भूपाळी, पिंजरा अशा विविध चित्रपटांमधून त्यांनी केलेल्या भूमिका गाजल्या. संध्या यांच्या पार्थिवावर आज शिवाजी पार्क इथल्या स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

//<><><><><>//